किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● उत्कंठा

५ ● संस्कृती आणि आर्थिक विकास

११ ● देशातील वस्तुनिर्माण उद्योगाचे अंतरंग

२३ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी

'इन्सॉल्व्हन्सी अ‍ॅन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड'



**खंड १६ : अंक ९** **डिसेंबर २०१७**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७

ई-मेलः- ispe@vsnl.net

website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**

**खंड १६ (अंक ९) डिसेंबर २०१७**

**संपादक - अभय टिळक**


### *'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

● या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


● अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# उत्कंठा

'अर्थबोधपत्रिके'चा हा अंक हातात पडल्यापासून जेमतेम दोनएक आठवड्यांच्या आतच २०१७ सालाला अलविदा करून आपण सगळे २०१८ या वर्षात पदार्पण करू. 'हे वर्ष किती झटकन संपले नाही का...', असा, वास्तविक पाहता निरर्थक शेरा मारत वर्षामागून वर्षे आपण ओलांडत राहतो. तसे बघितले तर सगळे दिवस सारखेच असतात. तरीही, येत्या वर्षाच्या पोटात नक्की काय दडलेले असेल, याची उत्कंठा आपल्या सगळ्यांच्याच मनात दाटून राहते. ते स्वाभाविकही असते. कारण, आजच्या तुलनेत उद्याचा दिवस काही तरी वेगळा असेल, चांगला जाईल, नवीन दिशा उजळणारा ठरेल... अशा अपेक्षांच्या झुल्यावर कायम हिंदोळत राहणे, हाच मानवी मनाचा स्वभाव होय. त्यांतून, २०१८ हे येणारे नवीन वर्ष तर एका अर्थाने फारच महत्त्वाचे ठरते. ते अशासाठी की, २०१८ सालातील सप्टेंबर महिना 'सब्प्राइम क्रायसिस'च्या दशकपूर्तीचा महिना ठरणार आहे. बेलगामपणे २००५-०६ सालापासून मुक्त हस्ताने अमेरिकी बँकांनी अपात्र ऋणकोंना वाटलेल्या कर्जांची परतफेड स्वाभाविकपणेच थकल्यामुळे अडचणीत आलेल्या अमेरिकी बँकिंग व्यवसायाचा डोलारा, लेहमन ब्रदर्सने १५ सप्टेंबर २००८ रोजी जाहीर केलेल्या दिवाळखोरीने थेट जमिनीवर आला. त्या धुरळ्यामधून उठलेल्या मंदीच्या लोटांनी वैश्विक अर्थव्यवस्था पुरती घेरली गेली. दमेकरी रुग्णासारखी अवस्था झालेली जागतिक अर्थव्यवस्था २००८ ते २०१७ या नऊ वर्षांमध्ये पूर्वपदावर सर्वार्थाने आजही आलेली नाही. त्या वित्तीय अरिष्टाची कारणमीमांसा आणि त्याचा पुढील संभाव्य प्रवास या संदर्भातील अनेक कथने यथावकाश उगम पावली. 'सब्प्राइम' कर्जांच्या फुटलेल्या फुग्यातून निपजलेल्या मंदीचे मळभ कधी विरळ होतील, याची चिंता त्या काळात सर्वांनाच लागलेली होती. त्या वेळी, एका अमेरिकी अर्थाभ्यासकाने मांडलेले भविष्यकथन एकदम चर्चाविषय बनून गेले. २००८ सालातील वित्तीय अरिष्टामुळे उद्‌भवलेल्या या मंदीची मांड २०२० सालापर्यंत ढिली होणे अवघड आहे, अशा आशयाचे त्या महाशयांचे कथन त्या काळात प्रचंड गाजले.



आता, उभे जग २०१८ सालात प्रवेशत असल्यामुळे वैश्विक अर्थव्यवस्थेचे चलनवलन येत्या दोन ते तीन वर्षांत पुनरुत्थानाच्या दिशेने होईल किंवा नाही, याची सचिंत उत्कंठा सगळ्यांच्याच मनामध्ये ठासून भरलेली आहे. जेव्हा केव्हा आणि जसे कसे हे पुनरुत्थान घडून येईल त्याचे स्वरूप नेमके कसे असेल, हे त्या उत्कंठेचेच एक परिमाण. हा आयाम अलीकडील काळात अधिकच प्रकर्षाने निर्देशित केला जातो आहे. त्याला कारणही तसेच आहे. ते असे की, वित्तीय अरिष्टाचे फलित असलेल्या मंदीच्या आजवरच्या वाटचालीदरम्यान रोजगारनिर्मितीचे आव्हान जगाच्या वेगवेगळ्या भागांत कमी-अधिक प्रमाणात उग्र बनते आहे. औद्योगिक विकासाच्या सध्याच्या चौथ्या पर्वात मुसंडी मारून पुढे येत असलेल्या 'डिजिटल' तंत्रज्ञानापायी तर मनुष्यबळ आणि भांडवल यांच्यादरम्यानच्या नात्याचीच मूलभूत पुनर्मांडणी होऊ घातलेली आहे. येत्या काळात याच आव्हानांचा सामना आपल्याला करायचा आहे. नववर्षाच्या शुभेच्छा ! ●●

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

संस्कृती

# संस्कृती आणि आर्थिक विकास

'आर्थिक विकास' ही संकल्पना उत्क्रांतशील आहे. 'विकासाचे अर्थशास्त्र' ही अर्थशास्त्राच्या प्रांगणातील उपशाखा साधारणपणे १९६०च्या दशकात ज्ञानविश्वाच्या क्षितिजावर उगम पावली. सुरुवातीच्या पर्वात 'आर्थिक वाढ' आणि 'आर्थिक विकास' या दोन्ही संकल्पना समानार्थीच गणल्या जात असत. पुढे मग, आर्थिक विकास ही संकल्पना व प्रक्रिया बहुआयामी असल्याचे वास्तव विचारविश्वात प्रस्थापित झाल्यानंतर उत्पन्नातील वाढ या एकदिश व्याख्येपासून तिची फारकत झाली. दरडोई उत्पन्नाच्या जोडीनेच, मग, शिक्षण, आरोग्य यांसारख्या जीवनांगांचा आर्थिक विकासाच्या व्याख्येच्या प्रांगणात प्रवेश झाला. त्या नंतर, १९९०च्या दशकाच्या प्रारंभी महबूब उल् हक आणि अमर्त्य सेन या धुरंधर अर्थतज्ज्ञांनी मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना प्रस्थापित करून 'आर्थिक विकास'नामक संकल्पनेच्या तिथवर झालेल्या प्रवासाला एक नवीनच निर्णायक वळण दिले. अमर्त्य सेन यांनी विकासाच्या संकल्पनेचा धागा स्वातंत्र्याशी जोडत, 'व्यक्तीच्या निवडस्वातंत्र्याच्या कक्षेचा विस्तार घडत राहणे म्हणजे आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान असल्याचे सिद्ध होणे', अशी व्याख्या मांडत 'केपेबिलिटी'चा एक नवीनच आयाम सगळ्या चर्चेला जोडून दिला.

गेल्या सुमारे दशक-दीड दशकभरादरम्यान आता चर्चा चालू झालेली आहे ती, विकासाच्या आगेकूचीवर प्रतिकूल प्रभाव पाडणा-या घटकांसंदर्भात. जागतिक तापमानवाढीच्या समस्येचा निर्देश आताशा याच संदर्भात वारंवार केला जातो. जगातील मोठ्या लोकसंख्येला येत्या काळात शुद्ध व पिण्यायोग्य अशा पाण्याला असलेला 'ॲक्सेस' उत्तरोत्तर दुर्लभ होत जाईल, अशी जी भीती व्यक्त केली जाते तिचा धागाही जोडला जातो तो विकासाच्या प्रश्नाशीच. मानवी स्थलांतराला निर्माण होत असलेले अथवा केले जात असलेले अडथळे हा आर्थिक विकासाच्या चर्चाविश्वातील आणखी एक आघाडीचा पैलू बनतो आहे, हेही इथे नमूद केलेच पाहिजे.



...आणि आर्थिक विकासासंदर्भातील चर्चाविश्वात आजवर कधीही कोठेच न डोकवलेला आणखी एक मुद्दा उसळी मारून अलीकडे सतत पृष्ठभागावर येताना दिसतो... तो मुद्दा अथवा पैलू म्हणजे सांस्कृतिक स्वातंत्र्याचा. 'संस्कृती'नामक अतिशय व्यामिश्र आणि बहुमिती संकल्पनेचे आर्थिक विकासातील योगदान हा पैलू जागतिक स्तरावरील विकासविषयक एकंदरच विचारविमर्शात आताशा प्रकर्षाने निर्देशित केला जाताना दिसतो. मुळात, आर्थिक विकासाच्या संकल्पनेप्रमाणेच 'संस्कृती' हीदेखील सतत उत्क्रांत होत राहणारी संकल्पना. परंतु, आर्थिक विकासच केवळ नव्हे तर, सर्वांगीण विकासाच्या संकल्पनेला संदर्भाची चौकट प्राप्त करून देणारी चीज म्हणून आज संस्कृतीकडे बघितले जाते. त्या त्या मानवसमूहांच्या संस्कृतीचा अविभाज्य अंग असलेली मूल्यसंपदा, संचित ज्ञान, कौशल्ये, परंपरा, संकेत व श्रद्धांचे विस्तीर्ण विश्व, संस्थात्मक रचना, धारणा व दृष्टिकोन, नातेसंबंधांच्या जाळ्याचे ताणेबाणे, समज व रूढी...अशांसारख्या अनंत बाबींचा संबंध आर्थिक विकासाच्या प्रक्रियेशी असतो एवढेच केवळ नाही तर या विविध बाबींमध्ये घडून येत असलेल्या बदलांचे भलेबुरे परिणामही विकासाच्या रंगरूपावर होत असतात, याचे आकलन आताशा प्रकर्षाने होऊ लागलेले आहे.

'संस्कृती' या संकल्पनेची आटोपशीर, सोपी व्याख्या करणे ही अतिशय अवघड बाब आहे. आर्थिक विकासासंदर्भात आजवर झडलेल्या सगळ्या विचारविमर्शादरम्यान संस्कृतीचा हा पैलू अ-लक्षितच राहिला होता. किंबहुना, या चर्चेच्या कक्षेबाहेरच त्याला ठेवण्यात आलेले होते. संस्कृतीमधील अनेक घटक आणि त्या घटकांचे विकासाच्या प्रक्रियेवर जाणवणारे पडसाद मोजमाप करता येण्याजोगे नसल्यामुळे कदाचित तसे घडले असावे. परंतु, आता मात्र संस्कृती आणि विकास यांच्यादरम्यानच्या नात्याकडे अतिशय सजगपणे बघितले जाते आहे. केवळ इतकेच नाही तर, आर्थिक विकासाचे रंगरूप व विकासाच्या प्रक्रियेची आगेकूच, सामाजिक स्थैर्य आणि पर्यावरणीय संरक्षण या तीनही बाबींवर संस्कृतीचा थेट परिणाम घडून येत असतो आणि तो परिणाम नेमकेपणे जाणून घेणे गरजेचे आहे, याचे भान समाजाभ्यसकांमध्ये अलीकडे प्रकर्षाने बिंबते आहे.

## प्रकृती, विकृती आणि संस्कृती

संस्कृती आणि आर्थिक विकास या दोहोंमधील संबंध जाणून घेण्यासाठी प्रथम 'संस्कृती' या संकल्पनेचा अर्थ नीट समजावून घ्यायला हवा. संस्कार आणि संस्कृती हे दोन्ही शब्द एकाच धातूपासून बनलेले आहेत. व्याकरणाच्या अंगाने बघता या दोन्ही शब्दांचा अर्थही एकच आहे. एखाद्या वस्तूमधील वैगुण्य दूर करून तिला नवीन, आकर्षक स्वरूप देणे हा 'संस्कार' या शब्दाचा अर्थ. जे निसगसिद्ध आहे त्यालाच 'प्रकृती' असे म्हणतात. प्रसंगवशात अशा निसर्गसिद्ध प्रकृतीमध्ये जे विकार निर्माण होतात त्यांना 'विकृती' असे संबोधले जाते. तर, मुळातील प्रकृतीमध्ये कोणताही विकार उत्पन्नच होऊ नये म्हणून प्रकृतीवर जे संस्कार केले जातात त्यांतूनच संस्कृतीचा उगम आणि विकास होत असतो. म्हणजेच, निसर्गसिद्ध असणारी प्रकृती तिच्यावर काही एक संस्करण करून अधिक गुणवान बनवणे हा 'संस्कृती' या शब्दाचा आशयगाभा होय. 'विकास' अथवा 'आर्थिक विकास' या संकल्पनेचा गाभाही तोच. मानवी जीवनाच्या कल्याणाची सर्वसाधारण पातळी उंचावणे हा कोणत्याही विकासोपक्रमाचा हेतू असतो.

निसर्गामध्ये माणूस आणि त्याच्या भवतालचे जग या दोहोंचा समावेश होतो. मानवी समाज आणि विश्व या दोन्हींमध्ये सतत देवाणघेवाण चालू असते. ज्या जगात आपण जगतो ते जग आपल्याला अधिकाधिक सुखकर बनवणे हेच मनुष्याच्या धडपडीचे ध्येय असते. त्यासाठीच जग बदलण्याचे प्रयत्न आपण करत असतो. पर्यावरणावर संस्कार घडवत आपले जीवन सुसह्य बनवण्याचा उपक्रम मानवी जीवनाच्या सुरुवातीपासून चालूच आहे. पर्यावरण पालटले की त्याचा प्रभाव माणसाच्या जगण्यावर पडतो. त्या बदलांना तोंड देण्यासाठी आपले आचारविचार, रहनसहन, राहणीमान, सवयी, परंपरा, व्यवस्था, संस्थात्मक जीवन यांत मानव समाजाला अनुरूप असे परिवर्तन घडवून आणावे लागते. संस्कृती आणि पर्यावरण यांचा संबंध असा आणि इतका निकटचा आहे. आर्थिक व्यवहार हा मानवी समाजाचा आणि पर्यावरणाचा अविभाज्य घटक असल्याने त्यांच्यादरम्यानच्या व्यवहारांतून आर्थिक विश्वाची जडणघडण होत राहते.



सभोवतालचे पर्यावरण बदलले की मनुष्याला त्याच्या अंतरंगातही बदल घडवून आणणे क्रमप्राप्त होते. म्हणजेच, प्रकृतीमधील बाह्य बदलांना प्रतिसाद देत मनुष्याला त्याचे अंतरंगही बदलावे लागते. त्यासाठी त्याला त्याच्या शरीराच्या सवयी पालटणे भाग पडते. केवळ इतकेच नाही तर, माणसाला त्याच्या मनबुद्धीवरही संस्कार घडवावे लागतात. त्यांमुळे, 'संस्कृती' या संकल्पनेमध्ये बाह्य पर्यावरणातील बदल आणि त्या बदलांना प्रतिसाद देत माणसाच्या अंतर्विश्वात घडून आलेले अथवा घडवून आणले गेलेले परिवर्तन या दोहोंचा समावेश होतो. प्रत्येक संस्कृतीमध्ये अनेकविध सामाजिक संस्थांचा आणि व्यवस्थांचा समावेश असतो. त्या व्यवस्थांचा समुच्चय म्हणजेच त्या त्या संस्कृतीची रचना. कोणत्याही संस्कृतीमधील विविध सामाजिक संस्था एकमेकींत गुंतलेल्या वा गुंफलेल्या असतात. त्यांमुळे, कोणत्याही एखाद्या व्यवस्थेमध्ये बदल घडून आला की त्या बदलाचे पडसाद अन्य व्यवस्थांमध्ये उमटतात. सामाजिक व्यवस्थांच्या ढाच्यामध्ये घडून आलेल्या वा येत असलेल्या बदलांचे परिणाम त्या त्या समूहांच्या जीवनपद्धतीवर होणे स्वाभाविकच ठरते. संस्कृतीच्या रचनेतील बदल आणि त्या त्या मानवी समूहाच्या आर्थिक व्यवहारांमधील परिवर्तन यांचे नाते हे असे असते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये संस्कृतीचा असणारा सहभाग नीट समजावून घेणे हे अलीकडे महत्त्वाचे गणले जाते ते त्यांपायीच.

'नवशोधन' अथवा 'नवसर्जन' ही आर्थिक विकासाची एक अतिशय महत्त्वाची प्रेरक शक्ती गणली जाते. कोणत्याही मानवी समाजाची संस्कृती ही केवळ त्या समाजाची आत्मखूण असते एवढेच नाही तर, त्या त्या समाजातील नवसर्जनशीलतेचा उगम, जोपासना आणि विकास त्या त्या समाजाच्या संस्कृतीची कूसच करत असते. समाजातील संचित, अर्जित ज्ञानाच्या, कौशल्याच्या मुशीतून नवशोधन निपजत राहते. समाजाच्या बौद्धिक, आध्यात्मिक, भावनिक व भौतिक धारणांची जडणघडण त्या त्या समाजाची संस्कृतीच करत असते. मानवी समाजातील घटकांचे एकमेकांशी असणारे नाते, त्यांच्यादरम्यान घडून येणारे व्यवहार यांचा पोत त्या धारणांच निश्चित करत असतात. त्या धारणांचे पडसाद आर्थिक विश्वात उमटतात.

**संस्कृतीचे आर्थिक विकासातील योगदान**

कोणत्याही मानवी समूहाची मूल्यसंपदा हा त्या समाजाच्या आर्थिक निर्णयांवर प्रभाव टाकणारा एक अतिशय महत्त्वाचा घटक असतो. त्या समाजातील घटकांमध्ये नांदणारी परस्परांमधील विश्वासाची भावना, नैतिकता, व्यवहारांतील पारदर्शकता जोपासण्याची प्रवृत्ती, दिलेल्या वेळेची शिस्त पाळण्याचा काटेकोरपणा, ठरलेला व्यवहार निखळपणे पार पाडण्याबाबतची दक्षता, बचतीची प्रेरणा, शिक्षणाचे मोल... अशांसारख्या अनंत गुणांचे सकारात्मक परिणाम त्या त्या समाजातील अर्थकारणावर घडत असतात. किंबहुना, त्या त्या समाजातील मूल्यसंचयाच्या गुणवत्तेवर त्या त्या समाजातील अर्थकारणाचा पोत अवलंबून राहतो.

संस्कृतीचे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील भौतिक योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. त्या त्या मानवी समाजाच्या संस्कृतीचे आविष्करण घडवणारे सांस्कृतिक उपक्रम, कार्यक्रम, जत्रा, उरूस, मेळे, यात्रा, देवदेवतार्चन, मेळावे, प्रदर्शने, उत्सव, लोकधर्माचे सादरीकरण, चर्चा, परिसंवाद, लोकमाध्यमांचे जागरण, लोककलांचे दर्शन...अशांसारख्या अगणित माध्यमांद्वारे निर्माण होणारा रोजगार व त्यांद्वारे सक्रिय बनणारे उत्पन्नाचे विविध मार्ग यांतून त्या त्या समाजातील संपत्तीमध्ये भरच पडत जाते. प्रत्येक समाजाला लोककलांचा समृद्ध वारसा लाभलेला असतो. लोकोत्सवांच्या आयोजनाद्वारे त्या त्या लोककलांच्या सादरकर्त्यांना व्यासपीठे मिळत राहतात. पारंपरिक कलाकौशल्यांच्या जिनसा तयार करणा-या कारागिरांना त्यांद्वारे बाजारपेठा खुल्या होत राहतात. परंपरेने अर्जन होत आलेल्या कलाकौशल्यांचे जतन-संवर्धन त्यांतून आपसूकच घडत राहते. पारंपरिक कला, कौशल्ये, उपचारपद्धती यांतून त्या त्या समाजातील सर्जनशीलतेला संधी आणि बहरण्यास अवकाश प्राप्त होत राहतो. जगभरातील सांस्कृतिक विश्वात कार्यरत असलेल्या उद्योगांचे वैश्विक स्तरावरील ठोकळ उत्पादनामधील योगदान जवळपास सात टक्क्यांच्या घरात जाते. 'सांस्कृतिक पर्यटण' ही पर्यटणव्यवसायातील एक नवीनच उपशाखा या सगळ्या विस्तारातून अलीकडे प्रस्थापित झालेली आहे. जागतिक स्तरावर पर्यटनापासून मिळणा-या उत्पन्नात सांस्कृतिक पर्यटनाचा वाटा २००७ साली चांगला ४० टक्के इतका होता.



खास करून जगाच्या विकसनशील पट्ट्यातील देशांच्या लेखी तर संस्कृतीचे त्यांच्या आर्थिक विकासातील योगदान बहुमोल ठरते. सांस्कृतिक उपक्रमांत क्रियाशील असणारी त्या त्या देशांतील विद्यापीठे, वस्तुसंग्रहालये, सांस्कृतिक केंद्रे व उपक्रम, कलाकेंद्रे...अशांसारख्या बाबी रोजगार आणि महसूलनिर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. काही विकसनशील देशांचा या संदर्भातील अलीकडचा अनुभव न्याहाळणे या संदर्भात उपयुक्त ठरावे.

सांस्कृतिक उद्योग-उपक्रमांद्वारे निर्माण होणा-या रोजगाराचे प्रमाण मालीसारख्या देशातील एकंदर रोजगारामध्ये २००४ साली जवळपास सहा टक्के (अगदी नेमके सांगायचे तर ५.८० टक्के) इतके होते. तर, मालीच्या ठोकळ देशी उत्पादनामध्ये (जीडीपी) संस्कृतीसंलग्न उपक्रमांद्वारे मिळणा-या उत्पन्नाचा वाटा २००६ साली होता जवळपास २.४० टक्क्यांचा. तीच बाब ब्राझीलसारख्या देशाची. संस्कृतीसंबद्ध सर्जनशील उद्योगांद्वारे (क्रिएटिव्ह इंडस्ट्रीज्) निर्माण केल्या जाणा-या उत्पादनाचा ब्राझीलच्या एकंदर देशी उत्पादनात १९९८साली वाटा होता ६.७ टक्क्यांचा.

पारंपरिक देशी कलाकौशल्यांवर आधारित अशा शोभिवंत, कलात्मक वस्तूंच्या उत्पादनाद्वारे तसेच निर्यातीद्वारे मोरोक्कोच्या देशी ठोकळ उत्पादनामध्ये तेथील संस्कृतीसंलग्न व्यवसायक्षेत्र १९ टक्क्यांचे योगदान २००९ साली देत होते. तर, सांस्कृतिक पर्यटनाचा घसघशीत हिस्सा असणा-या पर्यटन उद्योगाचा मोरोक्कोच्या ठोकळ देशी उत्पादनात वाटा २००९ साली होता साडेसहा टक्क्यांचा. चिमुकल्या थायलंडमधील कलात्मक वस्तूंच्या उत्पादनक्षेत्राने जवळपास २० लाख कारागिरांना २००९ साली रोजीरोटी उपलब्ध करून दिलेली होती. त्यांपैकी निम्मे तर पूर्ण वेळ त्याच व्यवसायात होते. सांस्कृतिक उद्योगांतील उलाढाल ग्वाटेमालामध्ये २००१ ते २००५ या संपूर्ण कालावधीदरम्यान दरसाल सरासरी ७.३ टक्के दराने वाढती राहिली. तिथल्या श्रमदलातील जवळपास ७.१४ टक्के श्रमिक एकट्या सांस्कृतिक उद्योगामध्ये सामावलेले आहेत.

संस्कृती आणि आर्थिक विकास यांच्यातील सहसंबंधांबाबत अधिक संशोधन का व कसे गरजेचे आहे, हे यांवरून स्पष्ट व्हावे. ●●

आर्थिक

# देशातील वस्तुनिर्माण उद्योगाचे अंतरंग

● डॉ. शरदिनी रथ

आपल्या देशातील श्रमदलात दर महिन्याला सरासरीने जवळपास १० लाख रोजगारेच्छूंची भर पडत राहते. या अशा प्रचंड संख्येने श्रमदलात दाखल होणा-या होतकरू हातांना रोजगार कसा व कोठून उपलब्ध करून द्यावयाचा हा प्रश्न अलीकडील पाचएक वर्षांत कमालीचा क्लिष्ट आणि जटिल बनतो आहे अथवा बनलेला आहे. रोजगाराच्या शोधात असलेल्यांना वर्षभरापैकी बराचसा काळ वाजवी अथवा रास्त मजुरीदराने रोजगार पुरवण्यास देशातील शेतीचे क्षेत्र आताशा कमी पडते आहे. पुरेशा प्रमाणावर चांगल्या प्रकारचा रोजगार निर्माण करून श्रमदलातील बहुसंख्यांना सामावून घेण्याची शेतीची ताकद गेल्या दोन दशकांदरम्यान क्रमाने उतरणीला लागली असल्याचा अनुभव येतो. साहजिकच, रोजगाराचा प्रधान पुरवठादार म्हणून बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या क्षेत्रावर झपाट्याने आणि मुख्यत्वेकरून झोत स्थिरावतो आहे. बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या या विशाल क्षेत्राचेही पुन्हा तीन उपविभाग पडतात अथवा कल्पिता येतात. शेतीसंलग्न पूरक उद्योगांचा उपविभाग हा त्यांतील पहिला. पशुपालन, मासेमारी, वनउपज जिनसांवर आधारित उद्योगधंदे यांचा समावेश या पहिल्या उपविभागात होतो. वस्तुनिर्माण उद्योगधंदे आणि बांधकाम क्षेत्राचा समावेश असलेला दुसरा उपविभाग गणता येतो. तर, सेवा उद्योगघटकांचा समावेश तिस-या उपविभागात होतो.

होतकरूं साठी वाजवी वेतनदराने मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीची क्षमता असणारे क्षेत्र म्हणून वस्तुनिर्माण उद्योगावर नियोजनकर्त्यांचा एतबार पूर्वापार राहत आलेला आहे. संगणकाधारित तंत्रशास्त्राचा तसेच संदेशवहन व संवाहन क्षेत्रातील अप्रतिहत प्रगतीचा भक्कम टेकू लाभलेल्या सेवाउद्योग क्षेत्राने गेल्या दोन दशकांदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये झपाट्याने भरारी घेतलेली आपण पाहतो आहोत.



साहजिकच, सेवाउद्योगक्षेत्रातील रोजगारात या काळात प्रचंड अशी वाढ घडून आल्याचा अनुभव आहे. देशाच्या ठोकळ उत्पादितामध्येही (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट - जीडीपी) वस्तुनिर्माण आणि सेवाउद्योगक्षेत्रांचे योगदान चांगले घसघशीत असेच आहे. बिगर शेती उद्योगधंद्यांमध्ये उपलब्ध होणारा रोजगार आणि बिगर शेती उद्योगधंद्यांचे स्थानांकन या दोन पैलूंसंदर्भात अलीकडील साधारणपणे दोन दशकांदरम्यान कशा प्रकारचे कल दृग्गोचर होतात, यांचा अभ्यास करणे विलक्षण मननीय ठरते. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयांतर्गत येणारी 'सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन' (सीएस्ओ) या विख्यात व्यवस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणारी आर्थिक गणना, अशा अभ्यासासाठी आवश्यक असणा-या अमूल्य आकडेवारीचा खजिनाच जणू आपल्याला उपलब्ध करून देत असते. धान्योत्पादन आणि मळे वा बगीचे यांसारखे उद्योग वा व्यवसाय वगळता सर्व प्रकारच्या उत्पादक उपक्रमांचा समावेश या गणनेमध्ये केलेला असतो. उद्योगव्यवसायांचा प्रकार, उत्पादने, स्थानांकन, उलाढाल, मालकी तत्त्वाचा प्रकार, रोजंदारी मिळालेल्या कामगारांची संख्या... अशा अनेकानेक बाबींसंदर्भातील माहितीचे संकलन आर्थिक गणनेमध्ये केलेले असते. आर्थिक गणनेची अगदी अलीकडील सहावी फेरी जानेवारी २०१३ ते एप्रिल २०१४ या कालावधीमध्ये संपन्न झाली. आर्थिक गणनेच्या या आधीच्या पाच फे-या अनुक्रमे १९७७, १९८०, १९९०, १९९८ आणि २००५ या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

बिगर शेती क्षेत्रातील उद्योगधंद्यांमध्ये समावेश असणा-या वस्तुनिर्माण उद्योगाच्या (मॅन्युफॅक्चरिंग) अंतरंगात घडून येत असलेल्या काही रोचक बदलांचा परिचय या ठिकाणी आपण करून घेणार आहोत. १९९८ आणि २०१३ या दोन वर्षी आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणनांद्वारे हाती आलेल्या आकडेवारीच्या विश्लेषणांती वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगार आणि वस्तुनिर्माण उद्योगघटकांचे स्थानांकन या दोहोंत १९९८ ते २०१३ या दीड दशकाच्या कालावधीदरम्यान घडून आलेल्या बदलांचे कल जाणून घेणे हा यामागील उद्देश होय. वस्तुनिर्माण उद्योगांशी संबंधित धोरणांच्या निश्चितीस उपकारक निष्कर्ष त्यांद्वारे हाती यावेत.

**शासनसंस्थेच्या भूमिकेतील बदल**

देशातील उद्यमशील उद्योजकांनी उद्योगव्यवसाय स्थापन करून त्यांद्वारे रोजगारनिर्मितीस चालना मिळावी यासाठी प्रोत्साहक धोरणे आखण्याचे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम केंद्र सरकार तसेच राज्य सरकारे करत असतात. उद्योजकांनी कर्जे उभारावीत यासाठी व्याजांचे दर नेमस्त पातळीवर राखणे, आयात-निर्यात शुल्कांमध्ये सवलती देणे, वेगवेगळ्या करविषयक सवलती जाहीर करणे, उद्योगांच्या उभारणीसाठी जमीन उपलब्ध करून देणे, पाणी तसेच विजेच्या शुल्कासंदर्भात सवलती जारी करणे...अशा प्रकारच्या प्रेरक धोरणांचा अंगीकार शासनसंस्था वेळोवेळी करत राहते. अशी विविध धोरणे, उत्पादनघटकांच्या बाजारपेठांतील परिस्थिती यांच्यादरम्यानच्या आदानप्रदानाद्वारे उद्भवणा-या औद्योगिक पर्यावरणाचा पर्याप्त लाभ उठवत आपापल्या उद्योगाचे आकारमान ठरवणे तसेच आपला उद्योग कोठे स्थापन करावयाचा या संदर्भात उद्योजकांनी निर्णय घेणे अपेक्षित असते. परंतु, १९९१ सालानंतर मात्र केंद्र सरकार तसेच राज्य सरकारे यांची या सगळ्यांतील भूमिका बदललेली आहे.

खास करून, उद्योगांच्या स्थानांकनासंदर्भातील धोरणांच्याबाबतीत तर ही बाब प्रकर्षाने पुढे आलेली आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये थोड्याफार प्रमाणात भौगोलिक असमानता ही दिसतेच. आर्थिक विकासाच्या वाढविस्तारातील अशी प्रादेशिक विषमता घटत जावी यासाठी शासनसंस्था स्वातंत्र्योत्तर काळात विविध धोरणे राबवत आली. औद्योगिकदृष्ट्या मागास विभागांत औद्योगिक गुंतवणूक व रोजगार वळावेत यासाठी करसवलती, वीजदरांत सूट... अशा प्रकारच्या उपाययोजनांचा अंगीकार सरकारे १९८०च्या दशकापर्यंत करत राहिली. परंतु, १९९१ साली भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अवतरलेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वानंतर शासनसंस्थेच्या भूमिकेमध्ये बदल घडून आला. आर्थिक-औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेतील प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने तुलनेने अ-विकसित भागांमध्ये पायाभूत सेवासुविधा पुरवणे, उद्योगांना करसवलती बहाल करणे अशा प्रकारच्या धोरणांद्वारे उद्योगांच्या स्थानांकनविषयक निर्णयांवर प्रभाव पाडण्याऐवजी उद्योगांना सोयीच्या ठरणा-या ठिकाणी अद्ययावत अशा पायाभूत सेवासुविधा पुरवण्याचा



धोरणात्मक पवित्रा शासनसंस्थेने १९९१ सालानंतर अंगीकारलेला आपण पाहतो आहोत. उद्योगव्यवसायांच्या स्थानांकनासंदर्भातील त्यापूर्वीच्या नियमनात्मक तरतुदी अस्तंगत झाल्यामुळे ज्या विभागांत अथवा विविध विभागांतील ज्या शहरांत तज्ज्ञ, प्रशिक्षित मनुष्यबळ, आरोग्य व शिक्षणाच्या दर्जेदार सुविधा, वीज, पाणी व अन्य नागरी सुविधा हजर आहेत अशा ठिकाणी व्यवसाय थाटण्याचा परिपाठ कॉर्पोरेट विश्वात रूढावला. व्यवसाय स्थापनेसंदर्भातील उद्योजकांचा कल ध्यानात घेऊन त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांचा पुरवठा वळवण्याचे धोरण शासनसंस्था गेल्या पाव शतकादरम्यान राबवत आलेली आहे. म्हणजेच, कोणत्या उत्पादनक्षेत्रामध्ये आपण भांडवल गुंतवणूक करायची एवढेच काय ते कॉर्पोरेट विश्व आता ठरवत नाही. तर, निवडलेल्या उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूक कोठे करावयाची याचाही निर्णय उद्योजक आता घेऊ लागलेले आहेत. त्यांमुळे, रोजगारनिमितीच्या प्रश्नाला आता आणखी एक परिमाण जोडले गेलेले आहे. कोणत्या उत्पादनक्षेत्रांना बढावा दिल्यामुळे अधिकाधिक रोजगारनिर्मिती घडून येईल एवढ्याच पुरता हा विषय आता सीमित राहिलेला नाही. तर, उद्योगांद्वारे होणारी रोजगारवाढ नेमक्या कोणत्या ठिकाणी साकारेल हेही आता तितकेच कळीचे ठरते आहे.

**आलेख, वस्तुनिर्माण उद्योगांच्या स्थानांकनाचा**

आपल्या देशातील बिगर शेती उद्योगधंद्यांद्वारे निर्माण झालेल्या रोजगाराचा प्रादेशिक अथवा भौगोलिक आलेख नेमका कसा आहे आणि अलीकडील काळात तो आलेख कसकसा बदलत गेलेला आहे, याचा आढावा या ठिकाणी आपण घेणार आहोत. विशेषतः, भारतीय अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेल्या वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगाराच्या भौगोलिक स्थानांकनाचे चित्र १९९८ ते २०१३ या दीड दशकादरम्यान कसे राहत आले यांवर या ठिकाणी मुख्य लक्ष केंद्रित केलेले आहे. १९९८ आणि २०१३ या दोन कालबिंदूंवर आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणना अहवालांद्वारे हाती आलेल्या सांख्यिकीच्या आधारे हे सारे विश्लेषण मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विश्लेषणासाठी राज्य नव्हे तर ‘जिल्हा’ हे भौगोलिक एकक संदर्भासाठी वापरलेले आहे.

वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगाराचे भौगोलिक स्थानांकन बव्हंशी कोठे आहे, हे तपासत असताना त्या रोजगाराच्या केंद्रीकरणाचे बिंदू नीट न्याहाळणे कळीचे ठरते. कारण, स्थलांतर, महानगरांची अफाट व बेसुमार वाढ, ती वाढ शहरांना सोसावी यासाठी त्यांचे करावे लागणारे सक्षमीकरण आणि सर्वांत मुख्य म्हणजे, रोजगारवाढीपासून वंचित राहिलेल्या विभागांची दुरवस्था...अशांसारख्या अनेकानेक बाबी रोजगाराच्या केंद्रीकरणाशी संबद्ध आहेत. सरकारच्या आर्थिक निर्णयांशी ज्या प्रकारे राजकारणाचा निकट संबंध असतो तसाच आणि तितकाच भूगोलही त्यांच्याशी जोडलेला असतो.

आर्थिक गणना अहवालाद्वारे हाती येणा-या सांख्यिकीचे अंतरंग आपण न्याहाळू लागलो की अनेकानेक रोचक बाबी आपल्या नजरेत भरतात. १९९८ साली घेण्यात आलेल्या आर्थिक गणनेच्या आकडेवारीनुसार देशातील एकूण बिगर शेती रोजगारापैकी जवळपास ५३ टक्के रोजगार केवळ १०० जिल्ह्यांमध्येच एकवटलेला होता. त्या वेळी देशातील एकूण जिल्ह्यांची संख्या होती ५९६ इतकी. परंतु, बिगर शेती उद्योगधंद्यांपैकी केवळ वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायघटकांचाच विचार केला तर, वस्तुनिर्माण उद्योगांतील एकंदर रोजगारापैकी जवळपास ५१ टक्के रोजगार देशातील केवळ ७० जिल्ह्यांमध्येच केंद्रीभूत झालेला होता.

या ७० जिल्ह्यांची राज्यवार यादी मोठी मननीय ठरते. पश्चिम बंगालमधील हावडा, मेदिनीपूर, मुर्शिदाबाद, उत्तर २४ परगणा, कोलकाता, हुगळी, दक्षिण २४ परगणा, बर्धमान, नाडिया, माल्डा आणि बांकुरा हे ११ जिल्हे या यादीत दिसतात. तमिळनाडूमधील कोईमतूर, तिरु नेलवेल्ली, विरु धुनगर, वेल्लोर, सालेम, ईरोड, नमक्कल, टूथुकुडी, कांचीपुरम, चेन्नई, थिरु वल्लूर आणि मदुराई या ११ जिल्ह्यांची वर्णी त्या ७०मध्ये लागलेली दिसते. चित्तूर, प्रकाशम्, नलगोंडा, मेहबूबनगर, रंगारेड्डी, निझामाबाद, अनंतपूर, पश्चिम गोदावरी, पूर्व गोदावरी आणि करीमनगर या (त्या काळी एकसंध असलेल्या) आंध्र प्रदेशातील १० जिल्ह्यांनी या यादीत वर्णी लावलेली होती. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, सोलापूर आणि अहमदनगर हे महाराष्ट्रातील आठ जिल्हे तिथे सापडतात. मध्य दिल्ली, पूर्व दिल्ली, नवी दिल्ली, उत्तर दिल्ली, ईशान्य



दिल्ली, वायव्य दिल्ली आणि दक्षिण दिल्ली हे दिल्ली राज्याचे सात जिल्हे या यादीत हजेरी लावताना दिसतात. गुजरातचा विचार करता अहमदाबाद, भावनगर, राजकोट, सुरत आणि वडोदरा हे पाच जिल्हे इथे सापडतात. लोकसंख्येच्या दृष्टीने देशात पहिल्या स्थानावर असलेल्या उत्तर प्रदेश या राज्यातील गाझियाबाद, कानपूर नगर, मोरादाबा, मुझफ्फरनगर आणि वाराणसी या पाच जिल्ह्यांची नावे या यादीत आलेली आहेत. देशाच्या दक्षिण टोकाला असलेल्या केरळमधील अलपुझ्झा, एर्नाकुलम, कन्नूर, कोल्लम आणि त्रिस्सूर हे पाच जिल्हे या सूचीमध्ये आहेत. तर, बेंगळुरू, बेळगाव, दक्षिण कन्नडा आणि म्हैसूर हे कर्नाटकातील चार जिल्हे इथे सापडतात. हरयाना, राजस्थान, पंजाब, ओदिशा आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांतील अनुक्रमे फरिदाबाद, जयपूर, लुधियाना, मयुरभंज आणि सागर हे प्रत्येकी एक एक जिल्हे या यादीत आपले नाव नोंदविताना दिसतात.

वस्तुनिर्माण उद्योगातील एकंदर रोजगारापैकी २६ टक्के रोजगार आंध्र प्रदेश, तमिळनाडू, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र या दक्षिणेकडील पाच राज्यांतच एकवटलेला असल्याचे १९९८सालातील आर्थिक गणनेची आकडेवारी आपल्याला सांगते. पश्चिम बंगालचा वाटा होता ११ टक्क्यांचा. तर, उत्तरेकडील उर्वरित सगळ्या राज्यांचा देशातील वस्तुनिर्माण उद्योगात रोजीरोटी मिळवलेल्या एकूण श्रमिकांमध्ये एकत्रित वाटा दिसतो १४.५ टक्क्यांचा. याचाच अर्थ हा की, अगदी १९९८ सालीही देशभरातील वस्तुनिर्माण उद्योगातील एकंदर रोजगारापैकी प्रमाणाबाहेर रोजगार दक्षिण भारतातील राज्यांमध्येच एकवटलेला होता. लोकसंख्येच्या दृष्टीने महाकाय असणा-या उत्तर प्रदेश, बिहार यांसारख्या राज्यांमध्ये त्या मानाने वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगाराचे केंद्रीकरण तसे नगण्यच दिसते-भासते.

त्या नंतरच्या १५ वर्षांत, म्हणजेच, २०१३ सालादरम्यान हे चित्र अंमळ बदललेले दिसते. देशभरातील एकंदर १०० जिल्ह्यांमध्ये बिगर शेती उद्योगव्यवसायांतील एकंदर रोजगारापैकी ५२ टक्के रोजगार केंद्रीभूत झालेला दिसतो. केवळ वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगाराचाच विचार केला तर देशातील ७० जिल्ह्यांमध्ये अगदी २०१३ सालीही एकूणांतील ५१ टक्के रोजगार एकवटलेला होता. फरक इतकाच की, त्या ७० जिल्ह्यांमध्ये

समावेश असणा-या जिल्ह्यांच्या राज्यवार यादीमध्ये काही ठिकाणी मधल्या काळात फरक पडलेला दिसतो. २०१३ सालातील यादीमध्ये पश्चिम बंगालमधील १० जिल्ह्यांचा समावेश होतो. १९९८ साली हीच संख्या होती ११. १९९८ साली त्या ११ जिल्ह्यांमध्ये समावेश असलेले १० जिल्हे २०१३ सालासाठीच्या यादीत स्थान टिकवून राहिलेले दिसतात. एकटा बांकुरा जिल्हा काय तो २०१३ सालातील यादीत दिसत नाही. २०१३ सालातील यादीमध्ये तमिळनाडूमधील नऊ जिल्हे दिसतात. १९९८ साली ही संख्या होती ११. त्या यादीमधील टूथुकुडी आणि मदुराई हे दोन जिल्हे २०१३ सालातील यादीमधून गळलेले दिसतात. २०१३ साली आंध्र प्रदेशातील यादी १९९८ सालातील यादीपेक्षा मोठी आहे. १९९८ सालच्या यादीत आंध्रातील १० जिल्हे होते तर, २०१३ साली जिल्ह्यांची संख्या दिसते १५. १९९८ सालातील यादीपैकी मेहबूबनगर हा जिल्हा २०१३ सालातील यादीमधून गळलेला दिसतो. तर, गुंटूर, हैदराबाद, कृष्णा, कुर्नूळ आणि मेदक या पाच जिल्ह्यांची वर्णी २०१३ सालातील यादीमध्ये नव्याने लागलेली असल्याचे दिसते. १९९८ सालातील यादीमध्ये महाराष्ट्रातील आठ जिल्हे होते. तर, २०१३ साली त्यांतील नागपूर आणि अहमदनगर हे दोन जिल्हे गळलेले दिसतात. बाकीचे सहा जिल्हे दोन्ही वर्षांत स्थान टिकवून आहेत.

दिल्लीचा विचार केला तर मात्र १९९८ सालातील यादी आणि २०१३ सालातील यादी या दोहोंत खूपच फरक पडलेला दिसतो. १९९८ साली दिल्लीतील सात जिल्हे यादीमध्ये होते. त्यापैकी, मध्य दिल्ली आणि उत्तर दिल्ली हे दोनच जिल्हे वगळता अन्य पाच जिल्हे २०१३ सालासाठीच्या यादीमधून बाहेर फेकले गेलेले आहेत. गुजरात हे बहुधा एकच असे मोठे राज्य आहे की ज्या राज्याच्याबाबतीत १९९८ सालासाठीची यादी आणि २०१३ सालासाठीची यादी यांत काहीही बदल झालेला नाही. दोन्ही वर्षांसाठीच्या याद्यांमध्ये तेच पाच जिल्हे समान राहिलेले आहेत. १९९८ सालासाठीच्या यादीमध्ये उत्तर प्रदेशातील पाच जिल्हे होते. २०१३ सालातील यादीमध्ये जिल्ह्यांची हीच संख्या पोहोचली आठवर. १९९८ सालातील यादीमध्ये असलेला मुझफ्फरनगर हा जिल्हा २०१३ सालासाठीच्या यादीमध्ये आपले स्थान काही टिकवू शकला नाही. परंतु, बरेली, फिरोझाबाद, गौतम



बुद्ध नगर आणि मीरत हे चार जिल्हे मात्र २०१३ सालासाठीच्या यादीत नव्याने दाखल झाले. केरळमधील पाच जिल्हे १९९८ साली यादीमध्ये होते. त्यांतील अलपुझ्झा आणि कन्नूर हे दोन जिल्हे २०१३ साली वगळले गेले, परंतु, थिरु व अनंतपुरम हा जिल्हा नव्याने दाखल झाल्याने २०१३ साली केरळमधील चार जिल्हे यादीत दिसतात. कर्नाटकातील बेळगाव आणि म्हैसूर हे १९९८ सालातील यादीमधील दोन जिल्हे २०१३ सालासाठीच्या यादीतून बाहेर गेल्याने २०१३ सालातील यादीत बेंगळुरू आणि दक्षिण कन्नडा हे दोनच जिल्हे उरले. १९९८ साली पंजाबातील एकट्या लुधियानाचा समावेश यादीमध्ये होता. २०१३ साली त्याच्या जोडीनेच अमृतसरही यादीत आला. १९९८ सालातील यादीत हरियानातील एकमात्र फरिदाबाद हा जिल्हा होता. २०१३ सालातील यादीत त्याच्याबरोबर गुरगावचाही समावेश झाला. तीच बाब राजस्थानची. १९९८ सालातील यादीमध्ये असणा-या जयपूरच्या जोडीनेच २०१३ साली बाजी मारली ती अलवारने. १९९८ सालातील अन्य राज्यांच्याबाबतीत २०१३ साली काहीच फरक नाही. मात्र, झारखंड आणि उत्तराखंड ही दोन राज्ये २०१३ साली अनुक्रमे धनबाद आणि हरिद्वार या प्रत्येकी एक एक जिल्ह्यासह यादीमध्ये नव्यानेच दाखल झाली.

आंध्र प्रदेश, तमिळनाडू, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र या दक्षिणेकडील चार राज्यांचा वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगारात असलेला एकत्रित हिस्सा १९९८च्या तुलनेत थोडासा घसरून २०१३ साली साधारणपणे २५ टक्क्यांवर आलेला आहे. पश्चिम बंगालचा हिस्सा १० टक्क्यांचा दिसतो तर उत्तरेकडील सगळ्या राज्यांचा एकत्रित हिस्सा १५ वर्षांनंतर अंमळ सुधारून १६ टक्क्यांच्या घरात पोहोचलेला आहे. थोडक्यात काय तर, काही जुजबी बदल सोडले तर वस्तुनिर्माण उद्योगातील रोजगाराचे टोकाचे केंद्रीकरण घडून येण्याची १९९८ सालातील आकडेवारीवरून दिसून आलेली प्रवृत्ती २०१३ सालीही अबाधित राहिलेली होती. उत्तरेकडील राज्यांचा वस्तुनिर्माण उद्योगातील हिस्सा वाढण्यात घसघशीत योगदान दिसते ते हरियानामधील गुरगावचे. मोटरींच्या निर्मितीशी संबंधित मोठ्या कारखान्यांच्या संख्येत घडून आलेली भक्कम वाढ हे त्यांमागील कारण.

**मरगळलेली रोजगारवाढ**

देशातील वस्तुनिर्माण उद्योगाचा विचार करता, १९९८ सालातील आर्थिक गणनेनुसार देशभरात एकंदर ६५ लाख ४३ हजार ९६१ इतके वस्तुनिर्माण उद्योगघटक कार्यरत होते. त्या नंतर १५ वर्षांनी, म्हणजे, २०१३ साली आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणनेनुसार देशातील वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायघटकांची संख्या दरम्यानच्या काळात जवळपास ५८ टक्क्यांनी वाढून १ कोटी ३ लाख २९ हजार ८१९वर पोहोचलेली होती. परंतु, गंमत म्हणजे, याच काळात वस्तुनिर्माण उद्योगधंद्यांमध्ये रोजीरोटी कमावणा-या कामगारांच्या संख्येत मात्र जेमतेम २४ टक्क्यांचीच भर पडली. १९९८ सालातील आर्थिक गणनेनुसार देशातील वस्तुनिर्माण उद्योगांत २ कोटी ४३ लाख ९० हजार ४४२ एवढ्या व्यक्तींना रोजगार मिळालेला होता. २०१३ सालातील आर्थिक गणनेच्या आकडेवारीनुसार, देशातील वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायांत रोजगार मिळालेल्या व्यक्तींची संख्या होती ३ कोटी ३ लाख ५७ हजार २४९ इतकी.

वस्तुनिर्माण उद्योगधंद्यांच्या एकंदर क्षेत्रापैकी नेमक्या कोणत्या आकारमानाच्या उद्योगांत १९९८ ते २०१३ या काळात रोजगारवाढ घडून आली हे पाहणेही रोचक ठरते. वस्तुनिर्माण उद्योगांतील व्यवसायघटकांत रोजीरोटी मिळालेल्यांच्या संख्येत १९९८ ते २०१३ या काळात सरासरीने २४.४६ टक्क्यांची वाढ घडून आलेली दिसत असली तरी, रोजगारातील सर्वाधिक, म्हणजे, ४७.४३ टक्क्यांची, वाढ घडून आली ती रोजंदारीवर १ ते १० पर्यंत कामगार असणा-या उद्योगव्यवसाय घटकांत. म्हणजेच, रोजंदारीवरील कामगारसंख्येनुसार वस्तुनिर्माण उद्योगघटकांच्या उतरंडीमध्ये सर्वांत तळाशी असलेल्या उद्योगघटकांतच मुख्यतः रोजगारनिर्मिती आणि पर्यायाने रोजगारवाढ होते आहे. रोजगारनिर्मितीमध्ये दुस-या स्थानावर असलेले वस्तुनिर्माण उद्योगघटक म्हणजे एकमालकी तत्त्वावरील उद्योग. उद्योगव्यवसायांचा हा गट निखळ स्वयंरोजगार या स्वरू पात मोडणारा. अशा उद्योगांत बाहेरील एकही कामगार रोजंदारीवर नेमलेला नसतो. मालक अथवा प्रवर्तकच तिथे काम करत असतो. व्यवसायघटकांच्या या गटातील रोजगारात १९९८ ते २०१३ या काळात २८टक्क्यांनी वाढ झाली.



या ठिकाणी याच वास्तवाच्या आणखी एका पैलूकडेही नीट बघावयास पाहिजे. वस्तुनिर्माण क्षेत्रातील उद्योगव्यवसायघटकांच्या संख्येत १९९८ ते २०१३ या १५ वर्षांच्या काळात सरासरीने ५८ टक्क्यांनी भर पडली. रोजंदारीवर नेमलेल्या कामगारांची संख्या १ ते १० या मर्यादेत असणा-या वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायघटकांच्या संख्येत याच काळात जवळपास ६६ टक्क्यांनी वाढ घडून आली. तर, बाहेरील एकही कामगार रोजंदारीवर नेमलेला नाही अशा एकमालकी तत्त्वावरील वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायघटकांच्या संख्येत १९९८ ते २०१३ या काळात ५८ टक्क्यांची वाढ झाली. याचाच अर्थ असा की, देशभरातील वस्तुनिर्माण उद्योगांच्या तसेच अशा उद्योगांमध्ये काम करणा-या कामगारांच्या संख्येत त्या दीड दशकादरम्यान जी वाढ घडून आली त्यांतील सर्वाधिक वाढ ही दर दर उद्योगघटकात रोजंदारीवर नेमलेल्या कामगारांच्या संख्येनुसार सर्वांत तळाशी असणा-या व्यवसायघटकांच्या उपवर्गातच एकवटलेली होती.

दर उद्योगघटकातील कामगार संख्येच्या दृष्टीने मोठ्या असणा-या वस्तुनिर्माण उद्योगघटकांची संख्या आणि अशा उद्योगांतील कामगारांची संख्या या दोहोंत १९९८ ते २०१३ या काळात नेमके काय बदल घडून आले ते बघणे, आता, अधिकच कुतूहलाचे ठरते. कामगारसंख्या १००पेक्षा अधिक असणा-या वस्तुनिर्माण उद्योगव्यवसाय घटकांच्या आणि अशा उद्योगांमधील कामगारांच्या संख्येत १९९८ ते २०१३ या काळात अनुक्रमे १९.१६ टक्के आणि २०.४४ टक्के अशी वाढ घडून आली. दर उद्योगघटकातील कामगारांची संख्या ५१ ते ९९ दरम्यान असणा-या उद्योगघटकांच्या आणि त्यांतील कामगारांच्या संख्येत याच काळात अनुक्रमे १९ टक्के आणि १८ टक्के अशी वाढ घडून आल्याचे आर्थिक गणनांची आकडेवारी आपल्याला सांगते. दर वस्तुनिर्माण उद्योगघटकातील कामगारसंख्या १० ते ४९ यादरम्यान असणा-या उद्योगव्यवसायांच्या आणि त्यांत काम करणा-या कामगारांच्या संख्येत, १९९८ ते २०१३ या कालावधीदरम्यान अनुक्रमे ३२ टक्के आणि २६ टक्के अशी घट घडून आली. म्हणजेच, देशातील वस्तुनिर्माण उद्योगाच्या मधल्या स्तरातील चित्र उत्साहवर्धक नाही, हेच वास्तव ही सांख्यिकी अधोरेखित करते.

**उत्पादनक्षेत्रनिहाय चित्र संमिश्र**

या सगळ्या चित्राचा आणखीही एक कोन आहे. आणि तो म्हणजे, देशातील वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रत्येक उद्योगघटकामधील कामगारांच्या सरासरी संख्येमधील बदलाचा. वस्तुनिर्माण उद्योगांच्या क्षेत्रातील दर उद्योगघटकामागे १९९८साली सरासरीने ३.७३ व्यक्तींना रोजगार उपलब्ध होत होता. २०१३ साली आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणनेची आकडेवारी बघितली तर, दर उद्योगघटकामागील सरासरी रोजगारात २.९४पर्यंत घट घडून आलेली दिसते. यांतील सर्वाधिक लक्षणीय बाब म्हणजे, एकमालकी तत्त्वावरील उद्योग तसेच रोजंदारीवरील श्रमिकांची संख्या १ ते ९ दरम्यान असणा-या उद्योगघटकांतील दर घटकामागील सरासरी रोजगारातही अनुक्रमे १.७७ वरून १.४३ पर्यंत आणि ४.०२ वरून ३.५७ पर्यंत घसरण घडून आलेली दिसते. म्हणजेच, वस्तुनिर्माण उद्योगांमधील श्रमिकांच्या संख्येनुसार रचलेल्या उतरंडीमध्ये तळाशी असणा-या उद्योगव्यवसाय घटकांच्या दोन उपगटांतील उद्योगघटकांची तसेच त्या उद्योगघटकांत काम करणा-या एकंदर कर्मचा-यांची संख्या जरी १९९८ आणि २०१३ या १५ वर्षांदरम्यान वाढलेली दिसत असली तरी याच दोन उपगटांतील दर उद्योगघटकामागील कर्मचा-यांच्या सरासरी संख्येमध्ये मात्र घसरणच दिसून येते. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून तसेच लघु व लघुतम उद्योगांच्या वाढविस्तारास चालना देण्यातून वस्तुनिर्माण उद्योगातील आणि पर्यायाने एकंदरच औद्योगिक क्षेत्रातील रोजगारनिर्मितीस बढावा मिळू शकेल, असे जी प्रमेय आपण आजवर उराशी बाळगत आलेले आहोत त्याच्या यथार्थतेबाबत मनामध्ये आशंका निर्माण व्हावी, असेच हे सारे वास्तव दिसते.

रोजंदारीवरील कर्मचा-यांची संख्या १० पर्यंत असलेल्या वस्तुनिर्माण उद्योगव्यवसायघटकांत, १९९८ साली, वस्तुनिर्माण उद्योगामधील एकंदर रोजगारापैकी तब्बल ६२.५६ टक्के रोजगार एकवटलेला होता. २०१३ साली आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणनेतील आकडेवारीनुसार याच दोन उपगटांत एकवटलेल्या रोजगाराचे वस्तुनिर्माण उद्योगातील एकंदर रोजगारामधील प्रमाण ६९.०५ टक्क्यांपर्यंत उंचावलेले होते.



भारतीय अर्थव्यवस्थेतील वस्तुनिर्माण उद्योगामधील रोजगाराच्या संख्येत १९९८ ते २०१३ या कालावधीदरम्यान २४.४६ टक्क्यांची जी काही तुटपुंजी वाढ घडून आलेली दिसते त्या वाढीची उत्पादनक्षेत्रनिहाय छाननी केली तर दिसणारे चित्र अधिकच चिंतनीय ठरते. यंत्रसामग्री आणि उपकरणे निर्माण करणारे उद्योग, मोटरी वगळता अन्य प्रकारची वाहतुकीची साधने व उपकरणे निर्माण करणारे उद्योग आणि अ-धातू खनिजे उत्पादन करणारे उद्योग या वस्तुनिर्माण उद्योगाच्या तीन उपक्षेत्रांतील रोजगारात १९९८ ते २०१३ या दीड दशकाच्या कालावधीदरम्यान अनुक्रमे ४५.५५ टक्के, ४३.०५ टक्के आणि १७.४४ टक्के इतकी घट घडून आली. तर दुसरीकडे, इलेक्ट्रिकल यंत्रसामग्री निर्माण करणारे उद्योग, तयार कपडे उत्पादन करणारे व्यवसायघटक आणि नाना प्रकारचे फर्निचर उत्पादन करणारे उद्योग यांत रोजीरोटी कमावणा-या कामगारांच्या संख्येत त्याच १५ वर्षांदरम्यान अनुक्रमे ११७.२५ टक्के, ९५.०१ टक्के व ८८.३४ टक्के अशी घसघशीत वाढ घडून आल्याचे चित्र संबंधित आकडेवारी आपल्या पुढ्यात मांडते.

रोजगारातील बदलांच्याबाबतीत या दोन टोकांमध्ये असणा-या उद्योगघटकांची यादीही तशी दुर्लक्षणीय अजिबातच नाही. अनंत प्रकारच्या इलेक्ट्रिकल जिनसा बनवणारे उद्योग, मूलभूत धातूउद्योग, मोटरी व ट्रेलर्स तयार करणारे उद्योग, नाना प्रकारची फॅब्रिकेटेड उत्पादने बनवणारे उद्योग, कातडी कमावण्यात कार्यरत असणारे व्यवसायघटक... अशांसारख्या उद्योगघटकांमधील रोजगाराच्या संख्येत १९९८ ते २०१३ या कालावधीदरम्यान साधारणपणे ६० ते ६५ टक्क्यांच्या दरम्यान वाढ घडून आलेली दिसते. तर, कपडा तयार करणे, लाकूडकाम, छपाई व प्रकाशन, रसायने व रासायनिक उत्पादने यांसारख्या वस्तुनिर्माण व्यवसायांत गुंतलेल्या घटकांमधील रोजगारातील वाढीचे प्रमाण अतिशय अल्प, म्हणजे, जेमतेम पाव टक्क्यापासून ते ११ टक्क्यांपर्यंत असल्याचे दिसते.

वस्तुनिर्माण उद्योगांतील रोजगारामध्ये अलीकडील काळात घडून आलेल्या बदलांचे स्वरूप हे असे दिसते. या बदलांना कारणभूत असणारे घटक शोधून काढणे हे संशोधकांच्या पुढ्यातील मुख्य आव्हान होय. ●●

पुरवणी

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## ‘इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड’
### आर्थिक स्वातंत्र्याच्या दिशेने एक पाऊल

● **डॉ. एम. एस. साहू**

कोणत्या ना कोणत्या कारणापायी व्यवसायामध्ये अपयश आलेल्या कंपनीला तोटा येऊ लागला की तिचे सारे वित्तीय समीकरण विस्कटून जाते. कारखाना अगर कंपनी उभी करण्यासाठी कर्जउभारणी केलेली असेल तर मग कंपनीच्या मालकांची अथवा प्रवर्तकांची परिस्थिती अधिकच बिकट बनते. घेतलेल्या कर्जावरील व्याजाचे हप्ते आणि मुदलाची परतफेड मग थकायला लागते. थकबाकी वाढायला लागली की धनको अस्वस्थ बनतात. परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली की मग असा थकबाकीदार कारखाना अगर कंपनी अवसायनात (इन्सॉल्व्हन्सी) काढणे भाग पडते. नवीन मालक अथवा चालक गाठून मग त्याच्या हाती कंपनीची सूत्रे सोपवली की कंपनीचे पुनरुत्थान घडून येण्याबाबतच्या आशा पल्लवीत होतात. तेही नाहीच जमले तर कंपनीची दिवाळखोरी (बॅन्क्रप्ट्सी) जाहीर करून ती बंद करण्याखेरीज अन्य पर्यायच राहत नाही. घायकुतीला आलेल्या कंपनीची मालमत्ता, यंत्रसामग्री विकून टाकून धनकोंनी त्यांच्या थकित रकमेची जमेल तेवढी वसुली मग करायची, एवढाच काय तो पर्याय अखेर उरतो. ही सगळीच प्रक्रिया सगळ्यांच संबंधितांच्या लेखी अतीव वेदनादायी असते. परंतु, अखेर ते पाऊल उचलावे लागणारच असेल तर ती सारी प्रक्रिया शास्त्रशुद्ध व पारदर्शकपणे पार पडावी अशीच सर्वांची इच्छा असते.



‘इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड’नामक संहितेची योजना नेमक्या याच कार्यासाठी झालेली आहे. हे सारे प्रकरण सगळ्यांनाच नवीन असल्यामुळे त्याच्याबद्दल फारशी स्पष्टता आजही फारच कमी लोकांना आहे. ‘इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड’ ही शब्दसंहतीदेखील आपल्या शब्दावलीमध्ये प्रवेशली ती २०१६ साली. या ठिकाणी विख्यात अमेरिकी कादंबरीकार अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या THE SUN ALSO RISES या त्या काळी गाजलेल्या कादंबरीतील एका वाक्याची आठवण होते. ‘‘तुझे दिवाळे निघाले तरी कसे ?’’, असा प्रश्न त्या कादंबरीतील एक पात्र दुस-या संबंधित पात्राला विचारते. त्यांवर तो संबंधित उत्तर देतो - प्रथम हळूहळू निघाले आणि मग एकदमच दिवाळे वाजले !. ‘इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड’चा आपल्या देशातील प्रवास नेमका असाच झाला. व्यावसायिक अपयशामुळे अडचणीत आलेले उद्योग अवसायनात वा/आणि नादारीत काढण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया निर्माण करण्याच्या दिशेने आपल्या देशात १९९२ सालापासून पावले उचलली जात होती. तेव्हापासून २०१५ सालापर्यंत फारसे काही घडले नाही. जे काही झाले ते त्यानंतरच.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

अडचणीत आलेले उद्योग अवसायनात आणि/अथवा नादारीत काढण्यासाठी आपल्या देशात विद्यमान असणा-या विविध कार्यप्रणालींचे एकात्म सुसूत्रीकरण घडवून आणत एक सुविहित कायदा अस्तित्त्वात आणण्यासाठी २०१५ सालातील डिसेंबर महिन्यात एक विधेयक संसदेपुढे मांडण्यात आले. संसदेच्या संयुक्त समितीपुढे ते यथावकाश सादर झाले. संसदेच्या दोन्ही सभागृहांची विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर, अखेर, २९ मे २०१६ या दिवशी 'इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी'कायदा अस्तित्त्वात आला. आर्थिक उदारीकरणाला आपल्या देशात १९९०च्या दशकाच्या प्रारंभी ठोसपणे सुरुवात झाली. आर्थिक खुलेपणाच्या पर्वाचे आगमन भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये झाल्यानंतर उद्योगव्यवसायांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा, खरे पाहता, विस्तारल्या जाणे अपेक्षित होते आणि अध्याहृतही. उदारीकरण आणि खुलेपणाचा माहौल नांदायला लागल्यानंतर व्यवसायउद्योगांना मुख्यतः तीन प्रकारच्या स्वातंत्र्याची अपेक्षा असते. आपल्याला पाहिजे त्या व पचेल त्या व्यवसायक्षेत्रात उद्योगधंदा स्थापन करण्याचे स्वातंत्र्य हे त्यांतील पहिले. मनाजोगता व्यवसाय त्या क्षेत्रात करण्याचे स्वातंत्र्य दुसरे. आणि, काही कारणामुळे मनासारखा धंदा नाहीच जमला तर त्या व्यवसायक्षेत्राला रामराम ठोकून आपले चंबूगबाळे तिथून उचलून बाहेर पाऊल घालण्याचे स्वातंत्र्य तिसरे.

स्वातंत्र्यानंतर पहिली जवळपास साडेचार ते पाच दशके भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये परवाने-परमिटांचे साम्राज्य नांदले. म्हणजे, ज्या कोणाला ज्या कोणत्या व्यवसायक्षेत्रात कारभार थाटावा असे वाटेल त्याला प्रथम परवाने व परमिटे पदरात पाडून घेण्याची अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत असे. म्हणजेच, पाहिजे त्या व्यवसायक्षेत्रात प्रवेश करण्याचे खुले स्वातंत्र्य उद्योजकांना त्या काळी नव्हते. १९९०च्या दशकाच्या प्रारंभी ज्या आर्थिक पुनर्रचनेला आपण हात घातला तिने हे पहिले स्वातंत्र्य उद्योजकांना मिळवून दिले. त्या नंतरच्या दशकात, म्हणजे, २००० सालानंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ज्या सुधारणा साकारल्या त्यांमुळे व्यवसाय मनाजोगता चालवण्यासंदर्भातील दुसरे स्वातंत्र्य उद्योजकांच्या पदरी आले. मात्र, प्रसंगी कारखाना बंद करून बाहेर पडण्याचे तिसरे स्वातंत्र्य काही त्यांना नव्हते.



वास्तविक पाहता, कोणत्याही कारणापायी व्यवसायामध्ये अपयश आल्यानंतर त्या क्षेत्रामधून संबंधित उद्योजकाला बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्यासंबंधीची कार्यप्रणाली सिद्ध करण्यासाठीच ओंकार गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीने तिचा अहवाल केंद्र सरकारला १९९३ सालीच सादर केलेला होता. परंतु, अनेकविध कारणांपायी व्यवसाय बंद करून उद्योगाच्या त्या क्षेत्रातून बाहेर पडण्याचे तिसरे स्वातंत्र्य काही भारतीय उद्योजकांना अगदी आता आतापर्यंत मिळालेले नव्हते. 'इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड'ची निर्मिती त्यासाठीच करण्यात आलेली आहे. कॉर्पोरेट विश्वातील तसेच व्यक्तिगत स्तरावरील अशा दोन्ही प्रकारांतील उद्योगांची नादारी जाहीर करण्यासंदर्भातील आचारसंहितेचा समावेश या दस्तऐवजामध्ये आहे. कारखान्याच्या, कंपनीच्या अथवा उद्योगाच्या कर्जांची परतफेड करत असताना ज्या वेळी संबंधित मालक अथवा प्रवर्तकाच्या खात्यावर पहिलीवहिली थकबाकी चढेल त्याच वेळी नादारीसाठी अथवा कारखाना अवसायनात काढण्यासाठी कार्यप्रक्रिया चालू करण्याची तरतूद या संहितेमध्ये आहे. कर्जांच्या परतफेडीचा हप्ता पहिल्यांदा जेव्हाकेव्हा थकेल त्याच वेळी, काही प्रकारच्या कायदेविषयक व कार्यप्रणालीविषयक तरतुदींची यथाविधी पूर्तता केल्यानंतर संबंधित उद्योगाचे व्यवस्थापकीय मंडळ बरखास्त करून कारखान्याची मालमत्ता, व्यवस्थापन व त्याचे नियंत्रण मालक अथवा प्रवर्तकांकडून दुस-या व्यक्तीकडे अथवा व्यवस्थेकडे सोपविले जावे, अशा प्रकारची कार्यपद्धती या संहितेमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. 'इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड'चे स्वरूप हे असे मुख्यतः प्रतिबंधात्मक स्वरूपाचे आहे. शक्यतो कर्जांची थकबाकी उद्‌भवूच नये अशा पद्धतीने कारखाना वा उद्योग चालवण्याची ऊर्मी संबंधित व्यवसायाच्या मालक अथवा प्रवर्तकांच्या मनीमानसी जागती असावी, हे इथे अपेक्षित आहे. एकदा का थकबाकी नावावर चढली आणि असा उद्योग अवसायनात काढण्याबाबत यंत्रणेकडे रीतसर अर्ज दाखल झाला की संबंधित उद्योगाचे नियंत्रण मालकांकडून धनकोंकडे जाते, ही यांतील खरी कळीची तरतूद होय. त्या उद्योगासंदर्भात मग काय निर्णय घ्यावयाचा ते ठरविण्याचे अधिकारही मग धनकोंच्याच हाती राहतात.

कोणत्याही देशाचा आर्थिक वाढविकास सर्वसाधारणपणे तीन बाबींवर अवलंबून राहतो. त्या त्या देशाच्या अर्थव्यवस्थेत उपलब्ध असणारे उत्पादन घटक व साधनसामग्री आणि त्या अर्थव्यवस्थेतील संस्थात्मक जीवन हा झाला त्यांतील पहिला घटक. आर्थिक विकासाला चालना देणारा दुसरा घटक म्हणजे बाजारपेठीय स्पर्धा. तर, अर्थव्यवस्थेतील सर्जनशीलता आणि सर्जकशक्ती हा झाला विकासाच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकणारा तिसरा घटक. अर्थव्यवस्थेतील सर्जकशक्तीमुळे तसेच नवसर्जनामुळे उपलब्ध असणा-या उत्पादनसाधनांची उत्पादकता सरासरीने उंचावते. अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धात्मकतेला वाव जितका अधिक तितकी तुलनेने अकार्यक्षम उद्योगव्यवसाय व कारखाने व्यवहारातून हद्दपार होण्याचे प्रमाण अधिक. अशी चाळणी लागून गेल्यानंतर मग कार्यरत राहणारे कार्यक्षम उद्योग उत्पादकता चांगल्यापैकी सरस असलेल्या उत्पादनघटकांचा पर्याप्त वापर घडवून आणत अर्थव्यवस्थेतील उत्पादन व उत्पन्नवाढीचा सरासरी वेग दमदार बनवतात. जगभरातील विकसित देशांमध्ये घडून येणा-या आर्थिक वाढविकासातील जवळपास ८० टक्के वाढ स्पर्धा आणि नवसर्जन या दोन घटकांद्वारे घडून येत असते, हे वास्तव अनेकानेक अभ्यासांद्वारे आजवर पुढ्यात आलेले आहे. विकसनशील देशांमध्ये मात्र याच्या नेमका उलटा प्रकार दिसतो. जगाच्या विकसनशील पट्ट्यातील देशांमध्ये साकारणा-या आर्थिक वाढविकासामध्ये स्पर्धा आणि नवसर्जन या दोन घटकांचे योगदान दिसते अवघे ४० टक्क्यांच्या आसपास. साहजिकच, आर्थिक वाढविकासाचा वार्षिक सरासरी दर चांगल्यापैकी उंचावायचा असेल तर देशाच्या अर्थव्यवस्थेतील स्पर्धात्मकतेचे आणि नवसर्जनशीलतेचे सक्षमीकरण जारी राखणे अनिवार्यच ठरते.

...आणि खरी मेख दिसते ती नेमकी इथेच. कारण, स्पर्धा आणि नवसर्जन यांना पूरक वातावरण लाभायला लागले की त्या पर्यावरणात लाभहानीचे चक्र गतिमान बनते. सबळ स्पर्धेच्या सोसाट्यात तुलनेने अकार्यक्षम उद्योगधंद्यांचा टिकाव लागत नाही. असे उद्योगव्यवसाय मग मरतात. नवसर्जनाने बाळसे धरले की जुने उत्पादनघटक, जुनी यंत्रे व तंत्रे कालबाह्य ठरतात. साहजिकच त्यांच्या पुरवठादारांवर संक्रांत येते.



अर्थव्यवस्थेत एकदा सुरूझालेले हे चक्र वाढीव गतीने मग फिरतच राहते. जितकी स्पर्धा अधिक, नवसर्जन जितके अधिक तितके अपयशाचे प्रमाणही अधिक असे समीकरण अशा अर्थव्यवस्थांमध्ये स्थिरावू लागते. अर्थव्यवस्थेतील गतिमानता टिकवून धरण्यात भरीव योगदान देणारा आणखी एक घटक म्हणजे त्या त्या अर्थकारणातील प्रत्येक घटकाला मिळणारे स्वातंत्र्य. विशेषतः, उत्पादक स्वरूपाच्या कामात सक्रिय असणा-या उद्योगधंद्यांच्या लेखी तीन प्रकारचे स्वातंत्र्य कळीचे ठरते. उद्योगव्यवसायाच्या वा उत्पादनाच्या कोणत्याही क्षेत्रात धंदा वा कारखाना चालू करण्याचे स्वातंत्र्य, एकदा चालू केलेला व्यवसाय निगुतीने प्रगतीपथावर राखण्याचे स्वातंत्र्य आणि कोणत्याही कारणाने का होईना उद्योगव्यवसायाच्या त्या विविक्षित प्रांतात अपयश पदरी पडले तर तिथून गाशा गुंडाळून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य अशा तिपेडी स्वातंत्र्याचे योगदान आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मोलाचे ठरत राहते.

या तीनपैकीही तिसरे स्वातंत्र्य उद्योगांना लाभणे हे अर्थकारणाच्या व्यापक हिताच्या दृष्टीनेही कळीचे ठरते. बाजारपेठीय स्पर्धेचे प्रमाण, रूप, तीव्रता एकाएकी वाढल्यामुळे, व्यापारचक्रातील अनपेक्षित चढउतारांपायी किंवा धंद्यासंदर्भातील आडाखे चुकल्यामुळे काही कारखाने वा कंपन्या अडचणीत येणे अगदी स्वाभाविक ठरते. असे उद्योग मग तोट्यात जातात. त्यांचे वित्तीय चक्र पार ढासळते. साहजिकच, अशा कारखान्यांनी घेतलेली कर्जे थकतात. नावावर थकबाकी चढली की नव्याने भांडवलउभारणी अवघड बनते. कंपनीची वाटचाल अवरुद्ध बनते. वापराविना यंत्रसामग्री थंड पडून राहते. एकंदरीनेच त्या उद्योगाची प्रस्थापित क्षमता आणि त्या उद्योगामध्ये वापरण्यात आलेल्या उत्पादनघटकांचा पुरेपूर वापर होण्याचे थांबूनच जाते. दुसरीकडे, कर्जांची परतफेड थकल्याने धनकोही अडचणीत येतात. यांमुळे, अडचणीत आलेले कारखाने व त्यांचे धनकोच काय ते गती हरवून बसतात असे नाही तर, हे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले तर त्या अर्थव्यवस्थेच्या एकंदर क्षमतेचीच सरासरीने हानी होते. अशा परिस्थितीत, अडचणीत सापडलेल्या कारखाने व कंपन्यांना संबंधित उत्पादनक्षेत्रामधून निवृत्त होण्यास अनुकूल प्रणाली निर्माण करणेच उपकारक ठरते.

आर्थिकदृष्ट्या हलाखीत गेलेल्या मालकांनी अथवा प्रवर्तकांनी आपल्या कंपन्या अवसायनात काढल्या अथवा नादारी जाहीर केली तर दोन गोष्टी घडतात. एक म्हणजे, अशा कुंठित उद्योगांमध्ये गुंतून पडलेल्या उत्पादनघटकांचा वापर अन्य सक्षम उद्योगधंद्यांना करता येतो. म्हणजेच, पुरेपूर वापराअभावी उत्पादनघटकांचा होणारा अपव्यय थांबतो. अकार्यक्षम उद्योगांकडून असे उत्पादनघटक मग तुलनेने सक्षम, उत्पादक क्षेत्रांकडे वळवले जातात. त्यांद्वारे अर्थव्यवस्थेच्या सरासरी उत्पादकतेची कमान उंचावते. समजा, बंद उद्योग दुसऱ्याने विकत घेतले तर प्रस्थापित उत्पादनक्षमतेचा पर्याप्त वापर चालू होतो. 'इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड' हे असे आर्थिक स्वातंत्र्य विस्तारणारे पाऊल होय. ●●

---

**प्रमुख संदर्भ**

(१) भारतीय संस्कृतिकोश, नववा खंड, विहार ते सिंधी लोक; संपादक- पंडित महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक - तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती - १९७६, पृष्ठे - ५९६-६१०.

(२) भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या एक संलग्न संशोधिका डॉ. शरदिनी रथ यांनी संस्थेमध्ये केलेल्या सादरीकरणावर आधारित पहिला लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या २०१७ सालातील ऑक्टोबर महिन्याच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला होता. डॉ. रथ यांनी त्या नंतर अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांसाठी तयार केलेले टिपण या अंकात सादर केलेले आहे.

(३) केंद्र सरकारस्थापित ''इन्सॉल्वन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया'' या संस्थेचे अध्यक्ष डॉ. एम. एस. साहू यांनी 'इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बॅन्क्रप्ट्सी कोड इन् परस्युट ऑफ इकॉनॉमिक फ्रीडम' या विषयावर भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये ३ ऑक्टोबर २०१७ या दिवशी व्याख्यान दिले. त्या व्याख्यानाचा गोषवारा 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी आवर्जून सादर केलेला आहे.

● **Websites**-:

(1) https://www.unesco.or.kr/eng/front/programmes : The power of Culture for Development, United Nations Educational, Scientific and Cultural Organization, 2010. ●●



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८०० /- रुपये** |

# *ग्रंथालयातील पुस्तके*

## ● INDIA'S FOREIGN POLICY
### COPING WITH THE CHANGING WORLD

Updated Edition with a New Chapter on Pakistan, authored by Muchkund Dubey. This updated edition first published in India by Orient BlackSwan in 2016, paperback edition by Orient BlackSwan Private Limited, Hyderabad, Pages - XVii + 446, Price - Rs. 495/-.

भारताचे परराष्ट्रधोरण आणि परराष्ट्रसंबंध यांच्या संदर्भात वाचन करणा-यांना 'मुचकुंद दुबे' हे नाव अपरिचित असणे केवळ असंभव. देशाचे परराष्ट्र सचिव म्हणून १९९०च्या दशकाच्या अखेरीस सेवा बजावलेल्या दुबे यांची परराष्ट्र मंत्रालयातील प्रदीर्घ कारकिर्द अनुभवसंपन्न गणली जाते. बांगला देशामधील भारताचे उच्चायुक्त, संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे कायमस्वरूपी प्रतिनिधी... अशांसारख्या अनेकविध जबाबदा-या परराष्ट्र सेवेतील कारकिर्दीदरम्यान पेललेल्या दुबे यांनी, आंतरराष्ट्रीय संबंध, देशाचे परराष्ट्र धोरण, देशाच्या सामाजिक तसेच आर्थिक विकासासाठी पर्यायी व्यूहरचना व धोरणात्मक चौकट...यांसारख्या विविध विषयांसंदर्भात आजवर विपुल लेखन केलेले आहे. त्या औरसचौरस लेखनावर बेतलेला दुबे यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणासंदर्भातील ग्रंथ २०१२ साली प्रकाशित झाला. त्याच ग्रंथाची सुधारित आवृत्ती म्हणजे प्रस्तुत ग्रंथ. मोठ्या साक्षपाने अद्ययावतीकरण करण्यात आलेल्या या ग्रंथामध्ये, दुबे यांनी पाकिस्तानबाबत लिहिलेल्या नवीन लेखाचा अंतर्भाव आवर्जून करण्यात आलेला आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांना आताशा जोडल्या जात असलेल्या आर्थिक बाबींसंदर्भातील मुत्सद्देगिरीच्या अस्तराची अत्यंत प्रगल्भ जाण, हे दुबे यांच्या व्यासंगाचे मुख्य वैशिष्ट्य. परराष्ट्र संबंधांसंदर्भातील दुबे यांचे विवेचन आगळे व रोचक ठरते ते त्यांमुळेच. देशाच्या परराष्ट्र धोरणाबाबत जिज्ञासा असणा-या सगळ्यांना, म्हणूनच, हा ग्रंथ मोलाचा वाटेल. ●●



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ● 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ● भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ● अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ● इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ● संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

● संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

● अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

● विकास चित्रे ● किशोर चौकर ● सुरिंदर जोधका ● रमानाथ झा
● अभय टिळक ● रवींद्र ढोलकिया ● ललित देशपांडे ● दिलीप नाचणे
● सुहास पळशीकर ● मनोहर भिडे ● नीळकंठ रथ ● रूपा रेगे-नित्सुरे
● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**